स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१३ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विद्यार्थिनींच्या वसतिगृहासाठी रावेर तालुक्यातील वाघोदा येथील चक्रधर ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने दोन सॅनिटरी नॅपकिन वेंडींग मशिन भेट देण्यात आल्यात.

विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने या मशिन वाटपाचा कार्यक्रम कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, विभागाचे संचालक प्रा. आशुतोष पाटील, चक्रधर ज्येष्ठ नागरिक संघाचे सिताराम महाजन, गंभीर महाजन व सुधाकर चौधरी हे उपस्थित होते. कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांनी आपल्या भाषणात विद्यापीठाचा समाजाच्या विविध क्षेत्रातील लोकांचे संपर्क वाढत असून हे विद्यापीठ सर्व घटकांचे आहे असे नमूद करून विद्यापीठाला सहकार्य करण्यासाठी अनेक सामाजिक संस्था पुढे येत आहेत. अशावेळी विद्यार्थ्यांनी देखील आपल्या जबाबदारीचे भान ठेवणे आवश्यक आहे असे मत व्यक्त केले. प्रा. एस.टी. इंगळे यांनी ज्येष्ठ नागरिक संघाने पुढाकार घेतल्याबद्दल आनंद व्यक्त केला. गंभीर महाजन यांनी आपल्या मनोगतात नागरिक संघाचे अध्यक्ष प्रल्हाद महाजन यांच्या पुढाकाराने हा निर्णय घेतल्याचे नमूद केले. यावेळी दर्शना पाटील या विद्यार्थिनीने मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष पवार यांनी केले. यापूर्वी धरणगाव तालुक्यातील नांदेड येथील शिक्षिका ज्योती राणे यांनी देखील सॅनेटरी नॅपकिन वेंडींग मशिन विद्यापीठाच्या वसतिगृहातील विद्यार्थिनींसाठी भेट दिली आहे.

<u>बातमी नं. २</u>

जळगाव दि.१३ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र प्रशाळेच्या वतीने शिक्षक प्रशिक्षणाचा आंतरवासिता उपक्रमाचा एक भाग म्हणून नुतन मराठा अध्यापक विद्यालयात क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या.

विभागप्रमुख डॉ. मनिषा इंदाणी यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. अध्यक्षस्थानी अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती डॉ. एस.डी. सोनवणे उपस्थित होत्या. क्रीडा शिक्षक एस.वाय. नन्नवरे, स्वाती तायडे यांनी स्पर्धेचे संयोजन केले. थाळी फेक स्पर्धेत मनिषा सपकाळे प्रथम तर संजना बेलदार द्वितीय ठरले. गोळा फेक मध्ये मनिषा सपकाळे प्रथम व उर्मिला साळुंखे द्वितीय, लिंबु चमचा स्पर्धेत निशा जैनने प्रथम तर नम्रता साळुंखे द्वितीय क्रमांक प्राप्त केला. निलांबरी येवले ही संगीत खुर्ची स्पर्धेची विजेता ठरली.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: १३ डिसेंबर, २०२२

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी